का चहुमुखी विकास किया। कई वर्षों तक आप आर्य विद्यालय के सचिव पद पर भी रहें। साथ ही उबाडो धर्मशाला के सचिव पद का भार भी आपके ही कन्धों पर था। इन्द्रायणी को-ऑपरेटिव्ह बैंक के संस्थापक संचालक पद को आपने विभूषित किया। आर्य वैदिक सिद्धान्तों पर निष्ठा रखनेवाले श्री वासवानी की प्रसन्न मुद्रा एवं उत्साहभरा व्यवहार उनसे मिलनेवालों के हृदयासन पर विराजमान होता था। उनकी विनम्रता, मिलनसारिका, प्रसिद्धीपराङ्मुखता, संगठनकुशलता, दूरदर्शिता, मधुरवाग्मिता, स्वाध्यायशीलता आदि बातें सभी के लिए प्रेरणा विषय बनी रही। उनकी जागरुकता व सैद्धान्तिक दृढता ने यथासमय आर्य समाज को बचाये रखा। सबको साथ लेकर उन्होंने आर्य गतिविधियों को सफलतापूर्वक आगे बढाया। आर्य समाज के भवन का निर्माण हो, या वेदप्रचार के कार्यक्रम श्री वासवानी ने इन सभी का संचालन बडी सूझबूझ के साथ किया। दूसरों को आगे कर स्वयं परदें की पीछे रहना और कार्यक्रमों को यशस्वी बनाना, यह उनकी न्यारी विशेषता रही है।

सामाजिक जीवन के साथ ही श्री वासवानी का पारिवारिक जीवन भी सफल रहा है। उनकी जीवनयात्रा शून्यावस्था से आरम्भ होकर धन व ज्ञान की उँचाई तक पहुंचती है और वह भी निगर्विता व अहंकारशून्यता के साथ! उनकी धर्मपत्नी श्रीमती मीरादेवी उन्हें प्रत्येक कार्य में उतने ही उत्साह के साथ सहयोग दिया। पुत्र संजय एवं कन्या रेखा कुमार अपने पिता के पदचिन्हों पर चलते हुए अनुव्रती बननें का प्रयास करते हैं।

ऐसे आर्य व्यक्तित्त्व का अकस्मात् संसार से विदा होना हम आर्यजनों के लिए भारी वेदना व शोक का विषय है। वैदिक आदर्शों की प्रतिमूर्ती व सादगीपूर्ण जीवन के धनी श्री वासवानीजी की रिक्तता सभी आर्यजनों को निरन्तर महसूस होती रहेगी। परमात्मा ऐसी सुयोग्य आर्य विभूति की पारलौकिक जीवनयात्रा सुखद, सफल व शान्तिप्रद करें, यही कामना!

शहीदों व क्रान्तिकारियों को नमन..!

मातृभूमि की रक्षा हेतु अपना सर्वस्व समर्पित करनेवाले हैदराबाद स्वतन्त्रता संग्राम के अमर शहीदों एवं सभी ज्ञात-अज्ञात आर्य क्रान्तिकारियों को विनम्र भाव से शत्-शत् अभिवादन एवं भावपूर्ण श्रद्धान्जलि...!

।।ओ३म्।।

मराठाची बोलु कवतिके । परि अमृतातेही पैजेसीं ज

ऐसी अक्षरेंचि रसिकें । मेळवीन ।। (संत ज्ञानेश्वर)

मराठी विभाग

उपनिषद संदेश

ज्ञानाचे फळ..!

य इमं मध्वदं वेद आत्मानं जीवमन्तिकाम्।
ईशानं भूतभव्यस्य न ततो विगुजुप्सते, एतद् वै तत्।।

(कठोपनिषद्-४/५)

अर्थ- जो माणूस कर्मफल भोगणाऱ्या या जीवात्म्याला जाणतो आणि असे समजतो की, 'जगाच्या उत्पत्तीमुळे परमेश्वराला आणि प्रकृतीलापण कोणताही लाभ होऊ शकत नाही!' तसेच या जगात जीव हाच कर्मफळांना भोगणारा आहे. कर्मफळांचा दाता परमेश्वर हा जगाच्या आत विराजमान आहे. चैतन्यस्वरुपी असल्याने तो परमात्म्याच्या अत्यंत जवळ बंधू रूपाने असल्याने भूत व भविष्याचा स्वामी आहे.' असे जो मानतो, त्याला परमेश्वराचे ज्ञान प्राप्त होऊन कधीच पश्चाताप होत नाही. हेच तर या ज्ञानाचे फळ आहे.

दयानंद वाणी

ईश्वराची मूर्ती नाहीच नाही..!

ज्या अर्थी परमेश्वर निराकार, सर्वव्यापक आहे, त्याअर्थी त्याची मूर्ती बनूच शकत नाही आणि जर केवळ मूर्तीच्या दर्शनाने परमेश्वराचे स्मरण होत असेल तर परमेश्वराने निर्माण केलेले पृथ्वी, पाणी, अग्नि, वायू, वनस्पती वगैरे वस्तूंच्या अद्भुत रचना पाहून ईश्वराचे स्मरण होणार नाही काय? ज्या डोंगरापासून माणूस मूर्ती घडवतो ते डोंगर पृथ्वी याच परमेश्वराने बनविलेल्या महामूर्ती आहेत, त्या पाहून परमेश्वराचे स्मरण होऊ शकणार नाही काय?

(सत्यार्थप्रकाश-अकरावा समुल्लास)

हैदराबाद मुक्ती संग्रामात आर्य समाजाचे योगदान!

– रमेश ठाकूर

भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास जसा गौरवमय व रोमांचकारी आहे, तितकाच हैद्राबाद मुक्ती संग्रामाचाही आहे. हैदराबाद हे भारतातील सर्वात मोठे संस्थान होते. इंग्रजांच्या 'फोडा व झोडा' या नीतीमुळे हिंदू व मुस्लिम स्थापण्याच हा एकमेव मार्ग समजला जाऊ लागला. तत्कालीन आसफजाही शासक मीर उस्मान अली बादशहाचे धोरण औरंगजेबाच्या मार्गाचे अनुसण करू लागले. ते स्वतंत्र इस्लामी शासक बनण्याचे स्वप्न पाहू लागले. शासकीय अत्याचार व धोरणाच्या दुष्परिणामामुळे पारस्परिक वैमनस्य व विरोध, शासनाच्या आश्रयाने अनेक प्रकारच्या बाधक व हानीकारक अराजक तत्वांचा उदय,



यांच्यातील दरी वाढत चालली होती. हैदराबाद संस्थानात ती अधिक उग्र बनली. शासकीय धोरणामुळे बहुसंख्य वर्ग उपेक्षित राहिला होता, तो पीडित व त्रस्तही झाला होता. इस्लाम राज्य प्रलोभन व पुरस्काराद्वारे समाजातील निम्न जाती-जमातीच्या लोकांचे धर्म परिवर्तन या सर्व स्तरीय संघर्षांना तोंड देत स्वतांत्र्य चळवळीस प्रारंभ झाला.

इ.स.१९११ मध्ये नवाब

उस्मानअली खाँ सिंहासनारूढ झाला. या बदलाचा परिणाम २७० वर्षाच्या औदार्यपूर्ण धोरणात कमालीचा बदल झाला. हिंदूंच्या धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय अधिकारांना पायबंद घालण्यात आला. याशिवाय याच काळात भारतात खिलाफत चळवळीस जोर चढला होता. यामुळे मुस्लिम समाज आक्रमक बनला होता. याच कालावधीत रजाकार पार्टीचा उदय झाला. या संघटनेचे काम आर्य-हिंदूंना मुस्लिम बनविणे, त्यांच्या स्त्रियांचे अपहारण करणे, त्यांच्यावर पाशवीय अत्याचार करणे हे होते. या संघटनेचे संबंध पंजाबच्या खाकसर चळवळीशी निगडीत होते. यांनी आर्य समाजाचा विरोध सुरु केला. यामुळे आर्य समाज अधिक प्राणवान, वर्चस्वी व तेजस्वी बनला. आर्य समाजाने हैदराबाद रियासती विरुद्ध (संस्थांना विरुद्ध) चळवळ उभी केली. सत्याग्रहाचा मार्ग अधिक गतिमान केला. हा एक रोमांचकारी इतिहास आहे. हा इतिहास आपल्या त्याग आणि बलिदानाने रचला, उभारला, घडवला. यात भाई बन्सीलाल व भाई श्यामलाल यांचा प्रमुख वाटा होता. हे बंधू अग्रस्थानी होतते. या उभयतांनी आपले सर्वस्व आर्य समाजासाठीच समर्पित केले होते. यांनी हैद्राबाद, विशेष करून मराठवाड्यात आर्य समाजाची नीव पक्की केली. त्यांचे कार्य आम्हा मराठवाडा वासियांसाठी स्वाभीमानाची व गौरवाची बाब आहे.

हैदराबादच्या नवाबाच्या विरोधात विद्रोहाची आणि संघर्षाची तुतारी फुंकून आर्य समाजाने भावी इतिहासाची जणू पायाभरणीच केली. पुढे १९४८ (भारतास १८४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाल्यानंतर एक वर्षाने) मध्ये लोहपुरुष, त्यावेळचे भारताचे गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी साकार रूप दिले. त्यावेळी सरदार वल्लभभाई म्हणाले होते - 'हैदराबाद राज्यात आर्य समाज सक्रीय नसता तर हैदराबाद संस्थानाचे भारतात विलीनीकरण एवढ्या सोप्या रीतीने व सहजपणे शक्यच झाले नसते.'

हैदराबाद आणि त्या अंतर्गत असलेला मराठवाडा मुक्तीसंग्राम सुलभ झाले. ते आर्य समाजाने सत्याग्रहाची जी विशाल मोहीम होती घेतली व प्रत्येक खेड्यातून सत्याग्रहासाठी माणसे पाठविली गेली. त्यामुळे एकट्या माझ्या गुंजोटी सरख्या छोट्या खेड्यातून शंभराच्या जवळपास तरुण सत्याग्रहात सहभागी झाले होते. या सत्याग्रहात केवळ हैदराबाद संस्थानातील लोकच सहभागी झाले होते असे नाही तर उत्तरप्रदेश, पंजाब या भागातूनही हजारो सत्याग्रही सहभागी झाले. निझाम सरकार यामुळे

किंकर्तव्यमूढ झाले. संस्थानातल्या बंदीशाकाही कमी पडल्या. निझामास काय करावे हेच कळेनासे झाले. परिणामी निझामास आपले संस्थान भारतात विलीन करण्याशिवाय दुसरा पर्यायच उरला नाही.

भारतीय इतिहासकारांनी या सत्याग्रहाची खऱ्या अर्थाने नोंद घेतली नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर, त्यांचे अनुययी सोलापूर निवासी स्व.वी.रा.पाटील (सोलापूर निवासी) यांनी सत्याग्रहाची पथके सोलापूरहून नियोजनबद्ध रीतीने पाठविण्याची व्यवस्था केली होती, यास म्हणावे तसे प्रकाशात आणले नाही, असेच म्हणावे लागेल. आर्य समाजाने हे जे केले ते निस्वार्थ भावनेने महात्मा नारायण स्वामी सारखी महान व्यक्ती उत्तरेतून इथे आली व सत्याग्रहास बळकटी दिली, प्रसिद्धी साठी नव्हे तर स्वातंत्र्यासाठी यात समर्पणाची भावना होती. राष्ट्रासाठी जागरुक, दक्ष व सक्रीय राष्ट्ररक्षक म्हणून, आपला धर्म समजून हे केले. त्यांचा उद्देश केवळ स्वातंत्र्य प्राप्तीचा होता.

हा लढा म्हणजे केवळ मराठवाडा मुक्तीचा लढा नव्हे, तर हैदराबाद संस्थानाच्या मुक्तीचा लढा होता. यात आर्य समाजाचा सिंहाचा वाटा होता. याची दोन कारणे होती -

१. आर्य समाजाने विश्वस्तरीय संघटन, 'सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा दिल्ली' येथे आहे. या सभेअंतर्गत १८७५ पासून सातत्याने स्वातंत्र्याचे स्फुल्लींग तेवत ठेवण्याचे काम आर्य समाजाने केले. यात स्वामी श्रद्धानंद, महात्मा नारायण स्वामी, सरदार भगतसिंग, रामप्रसाद बिस्मिल, राजे सयाजीराव गायकवाड, छत्रपती शाहू महाराज, स्वामी रामानंद तीर्थ, भाई श्यामलाल, भाई बन्सीलाल, न्या.केशवराव कोरटकर, पं.नरेन्द्रजी, पं.रामचंद्रजी देहलवीं, पं.विनायकराव विद्यालंकार, श्री घनश्यामसिंहजी गुप्त, स्वामी स्वतंत्रानंदजी, रतनलाल अवस्थी, पं.वीरभद्र आर्य, पं.कर्मवीरजी शंकरराव टोंपे, वीरभद्रे अंबेसंगे, मल्लप्पा सरसंबे, पं.प्रल्हादजी स्नेही, म.आनंद स्वामीजी, डी.आर.दास, पं.मंगलदेवजी शास्त्री, प्रभृती... किती जणांची नावे सांगावीत? या सर्वांना स्वातंत्र्याचा गुरुमंत्र आर्य समाजाचे संस्थापक महर्षि स्वामी दयानंदांकडून मिळालेला होत. स्वामी दयानंद म्हणाले -

'परकीयांच्या सोनेरी महालापेक्षा आपली स्वत:ची झोपडी अधिक प्यारी समजावी व ती खरेच प्यारी असते.' लोकमान्य बालगंगाधर टिळकांच्याही आधी स्वमा दयानंदांनी स्वदेशाची प्रेरणा दिली होती. याचा परिणाम म्हणेच हैद्राबाद संस्थान स्वतंत्र करण्यासाठी

सत्याग्रहाचा उभारलेला अहंसक लढा. स्वातंत्र्याची ही मशाल भारतभार पसरवण्याचे काम खऱ्या अर्थाने स्वामी दयानंदांनी आर्य समाजाच्या रूपाने केले. भारतीयात स्वाभीमान, मानवता, देशप्रेम, साधी राहणी व उच्च विचारसरणी ही भावना रुजविण्यासाठी युगद्रष्टा स्वामी दयानंदांचा संदेश खेडोपाडी व घराघरांपर्यंत पोहोंचवण्याचे काम आर्य समाजाने केले.

संबंध भारतात आर्य समाज सक्रीय झाला. हैदराबाद राज्यातही याचे पदार्पण होणे ही काळची गरजच होती. अजमेरचे श्री.भगवानस्वरूपजी यांचा आर्यसमाजाची स्थापना झाली. हे पहिले आर्यसमाज इ.स.१८९२ मध्ये प्रज्ञाचक्षू श्री गीरानंद स्वामींच्या प्रभावामुळे हैदराबाद येथील सुलतानबजारमधये आर्य समाजाची स्थापना झाली. श्री कामता प्रसाद प्रधान व महात्मा लक्ष्मणदास मंत्री निवडले गेले. दुसऱ्याच वर्षी म्हणजे इ.स.१८९३ मध्ये आर्य समाजाचा वार्षिकोत्सव कंदास्वामी बागेत झाला. हा क्रम पुढे चालूच राहिला. अनेक विद्वानांची भाषणे लोकांना ऐकण्याचे संधी मिळाली. जनता आर्य समाजाकउे आकर्षित झाली. त्यावेळी आर्य समाजाच्या उत्सवाच्या अध्यक्षस्थानी नवाब जाफरजंग, नवाब इमादुल्मुल्क, अघोरनाथ चट्टोपाध्याय यासारख्या प्रतिष्ठित मंडळींनी केले.

भारताचे स्वातंत्र्य प्राप्तीनंतरचे गृहमंत्री लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी आर्य समाजाचे स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्यातील कामाचे नेहमीच कौतुक केले आहे. ते म्हणायचे, 'आर्य समाजाने पृष्ठभूमी बनवली नसती तर तीन दिवसात हैदराबाद रियासत पोलिस ॲक्शनद्वारे स्वतंत्र होऊ शकले नसते.' एवढेच नाही तर त्यांनी भाई बन्सीलाल यांना दिल्लीस बोलावून घेतले होते व हैदराबाद रियासतच्या परिस्थितीबाबत सल्लामसलतही केली होती. हे देखील आर्य समाजाच्या कार्याची व भाई बन्सीलालजी यांच्या सक्षम नेतृत्वाची जाणीव करून देण्यास पुरेसे आहे. आर्य समाज राष्ट्रीय स्वातंत्र्य तसेच अस्पृश्यता, जाती-निर्मूलन, बालविवाह बंदी, विधवा विवाह, हिंदी प्रसार, हुंडा बंदी, खादी वस्त्र वापर इत्यादी सुधारणांसाठी अग्रेसर राहिला आहे.हैदराबाद मुक्ती संग्राम फार मोठा लढा आहे. या लढ्याचे केंद्र व नेतृत्व आर्य समाजच राहिले आहे, हे इतिहासाला कधीही विसरता येणार नाही.

(लेखक आर्य समाज गारखेडा औरंगाबाद चे प्रधान व म.गांधी मिशनचे शिक्षण समन्वयक आहेत.)

मो.९४२३१७८८०३

असा झाला श्रावणी वेद प्रचार

– नारायण कुलकर्णी

संपूर्ण जगात जेथे आर्यसमाज आहेत, तेथे दरवर्षी श्रावणी पर्व वेद प्रचाराने साजरा करतात.प्रत्येक आर्य समाज विद्वानांच्या भजनिकांच्या तारखा निश्चित करून काही ठराविक दिवस उत्सव करून मंगलकारी बनवतात.

मागील सुमारे २५ वर्षापासून महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभेतर्फे सर्व अंतर्गत आर्य समाजात आर्य विद्वान, भजनिक दिवस ठरवून पाठविले जातात. निमंत्रण आर्य प्रतिनिधी सभेचे असते. उदा. यंदा १ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट दरम्यान महाराष्ट्राच्या विविध भागात श्रावणी वेदप्रचार साजरा झाला. यात उत्तर भारतातून आलेल्या विद्वानांनी कमी प्रवासात दिलेल्या सर्व आर्य समाजात उद्बोधन केले. हे कार्यक्रम तीन-चार महिन्यापूर्वीच ठरतात. विद्वानांना पूर्वीच गाडीच्या तिकीटांचे रिझर्वेशन करता येते. समाजाला आलेल्या विद्वानांकडून लाभ घेण्यासाठी व पूर्व तयारीसाठी अवधी मिळतो. अशा प्रकारे नियोजन केवळ महाराष्ट्र पुरते मर्यादित आहे. या मागे श्रद्धेय ब्रह्ममुनिजींची दूरदृष्टी, त्याग, तपस्या आहे. त्यांच्या या धाडसी प्रयासाने एक वेगळा पायंडा चालू झाला. वयोमानाने ते आज थकत आहेत. तरी त्यांच्यात दुर्दम्य इच्छाशक्ती कार्यरत आहे. त्यांना साथ देण्यासाठी त्यांच्या सारखेच त्यागी अनुयायी त्यांनी निर्माण केले. प्रा.डॉ.नयनकुमारजी आचार्य, श्री राजेंद्र दिवे, श्री अर्जुनराव सोमवंशी, श्री लक्ष्मणराव आर्य, श्री तिवार इत्यादी अनेक कार्यकर्ते सेवा देत आहेत. ही महाराष्ट्रातील सर्व आर्य समाजासाठी अभिमानाची गोष्ट आहे.

वेद प्रचाराच्या कामात अनेक महात्मे तन-मन धनाने सहयोग करतात. मी लेखनीच्या माध्यमातून वेद प्रचार करतो. पण लेखनी पेक्षा वाणी जास्त प्रभावशाली असते, असा माझा अनुभव आहे. कारण त्यात लगेच प्रतिसाद मिळतो. मागील १०-१२ वर्षांपासून सभा मला ग्रामीण भागात प्रचाराला पाठविते. यावर्षी तब्बल १६ दिवस मला काम मिळाले. अर्थात २ महिन्यापूर्वीच मला तशी सूचना मिळाली. प्राणायाम, सूक्ष्म व्यायाम, योग्य आहार घेऊन मी स्वत:ला तंदुरुस्त ठेवत असतो. यावर्षी ९ ते २४ ऑगस्ट या काळात मला हिंगोली व हदगांव (जि.नांदेड) या भागातील बऱ्याच गावात वेदप्रचार करण्याचे भाग्य लाभले.

दि.०९ ऑगस्टला मी घोडा ता.कळमनुरी जि.हिंगोली येथे श्री नारायणराव देशमुख यांचे घरी पोहोचलो. तेथे दुपारनंतर त्यांच्या घरी हवन, वेद-प्रवचन केले. श्री प्रतापसिंह चौहान हे सभेचे भजनोपदेशक माझ्या सोबत होते. त्यांचा पहाडी आवाज अख्ख्या महाराष्ट्राला माहीत आहे. त्यांची सोबत असल्याने तेथून पुढचा प्रवास सुखकर गेला. रात्री श्री उमाकांत देशमुख यांच्या बैठकीत निवास केला. दुसऱ्या दिवशी जरोडा येथे आम्हाला नियोजनाप्रमाणे जायचे होते, पण जरोडा गुरुकुलाची जमीन कसणाऱ्या कास्तकाराच्या घरी हवन करून येळेगांव ता.कळमनुरी जि.हिंगोली येथे स्वातंत्र्य सैनिक पू.देव मुनी (श्री काळे पाटील) यांच्याकडे थांबलो. दि.११ रोजी त्यांच्या घरी हवन व त्यांच्या नातवाचा उपनयन संस्कार केला. परिसरातील १५-२० लोक उपस्थित होते. पुढील दिवशी गोशाळा मरडगा ता.कळमनुरी जि.हिंगोली येथे हवन करून पुढल्या दिवशी त्याच गावातील हवन, भजन, प्रवचन, अंधश्रद्धा या विषयावर प्रवचन झाले. ग्रामीण भागात महिलांमध्ये महिला प्रचारकाची नित्तांत गरज आहे. रात्री मुक्कामाला भाटेगाव ता.हदगांव जि.नांदेड येथे श्री शिवाजी दत्तराव शिंदे यांचे घरी निवास केला. हा परिवार पूर्णपणे आर्यसमाजी विचारांचा आहे. रात्री मारुती मंदिरात वेदावर प्रवचन झाले. भाटेगाव येथील लोकांनी महत्प्रयासाने आर्यसमाजासाठी जागा हस्तगत करून त्यावर पत्र्याचे शेड उभे केले आहे. तेथे दोन दिवस हवन, प्रवचन, भजन झाले. दुपारी तेथील जि.प.प्रा.शाळेत भजन व 'हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा इतिहास' सांगितला. 'हे तर आम्हाला माहीतच नव्हते', अशी तेथील शिक्षकांची प्रतिक्रिया होती. गावाजवळ २ कि.मी. अंतरावर एक टेकडी आहे. तेथे महादेवाचे मंदिर आहे. रिमझीम पाऊस सुरु होता. तरी पण आम्ही तेथे गेलो. सोबत स्थानिक कार्यकर्ते श्री जनार्दन शिंदे (स्वामी) होते. तेथील परिसर नयनरम्य आहे. बराच वेळ मी तेथे रमलो. दि.१५ ला रात्री मुक्काम येथे झाला. हे आर्यसमाज मंदिर तळणी सुंदर बांधले आहे. येथे निवास, हवन, प्रवचनाची उत्तम सोय आहे. श्री डॉ.तावडे व त्यांचे बंधू श्री मगर, श्री देवीदास महाराज तळणीकर, श्री देशमुख, श्री खामकर असे अनेक लोक क्रियाशील कार्यकर्ते आहेत. तिथे भजन, प्रवचनासोबत प्रश्नोत्तर, शंका समाधान चर्चा रंगल्या.

दि.१७ ऑगस्टला आम्ही शिऊर येथे प्रदीपराव देशमुख यांचे घरी निवास केला. भोजनानंतर रात्री मारुती मंदिरात

भजन झाले व 'विराट पर्व, महाभारता'वर प्रवचन पार पडले. येथे श्री संतोष देशमुख यांची भेट झाली. ते गुरुकुलाचे स्नातक आहेत. त्यांची दोन्ही मुले गुरुकुलात शिकतात. ते आर्यसमाजासाठी, गुरुकुल कान्हा बुट्टीबोरी, नागपूर साठी समर्पित जीवन जगत आहेत. दुसऱ्या दिवशी श्री प्रदीपराव देशमुख यांच्या घरासमोर मोठा शामीयाना टाकला होता. आसपासच्या परिसरातील ८ ते १० गावातील प्रतिष्ठित व्यक्ती निमंत्रित होत्या. वेदप्रचार हा मुख्य उद्देश असला तरी महर्षी दयानंद आर्ष गुरुकुल कान्हा-नागपूरचे संचालक श्री तासके साहेब (आर.टी.ओ.) यांचा सत्कार कार्यक्रम, श्री राजेश्वरराव देशमुख(शासकीय कॉन्ट्रॅक्टर) व त्यांचे बंधू श्री प्रदीपराव देशमुख यांनी आयोजित केला होता. श्री प्रदीपराव देशमुख यांचे व्यक्तिमत्त्व उदार आहे. ते आर्य समाजाचे कर्मठ कार्यकर्ते आहेत. ते कान्हा आर्ष गुरुकुल नागपूर, सर्वोदय चळवळ व भाजपा चे सक्रीय कार्यकर्ते आहेत. काही किरकोळ अपघातामुळे गुरुकुलचे आचार्य श्रद्धेय धर्मवीरजी येऊ शकले नाहीत. याची खंत सर्वांना होती. तरी त्यांनी दोन ब्रह्मचारी पाठविले होते.

सत्कार सोहळा हृदयस्पर्शी अनौपचारिक होता. तेथे प्रथम हवन झाले. यज्ञाचे ब्रह्मा हदगांव आर्य समाजाचे प्रधान श्री शेषराव शिंदे हे होते. नंतर भजन झाले. श्री राजेश्वरराव देशमुख शिऊरकर यांनी श्री तास्के साहेब(आरटीओ) यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार व मानपत्र अर्पण करून सन्मान केला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे वक्ते परळी येथून डॉ.नयनकुमार आचार्य यांना पाचारण केले होते. त्यांनी आपल्या भाषणातून श्री तासके साहेबांच्या निस्पृह, निगर्वी व प्रसिद्धी पराङ्मुख वृत्तीचा गौरव करून वैदिक तत्त्वज्ञानाच्या आवश्यकतेवर भर दिला. सोबतच श्री देशमुख बंधू ही समाज कार्यात देत असलेल्या योगदानाबद्दल त्यांचेही कौतुक केले. याच कार्यक्रमात हादगाव परिसरातील आर्य कीर्तनकार श्री तळणीकर महाराज यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. एका घरगुती कार्यक्रमाचा लाभ झाल्याचे दृष्य सर्वांनी अनुभवले. शिऊर गांव पैनगंगेच्या तीरावर अगदी छोटे अंदाजे शंभर घराचे गाव आहे.

शिऊरच्या कार्यक्रमानंतर आम्ही रात्री मुक्कामाला कंजारा जि.हदगांव येथे श्री तंवर यांचेकडे गेलो. दि.१९ ला सकाळी ७-८ लोकांच्या उपस्थितीत हवन, भजन, प्रवचन झाले. दुपारी शाळेत विद्यार्थ्यांसमोर 'हैद्राबाद मुक्ती संग्रामा'च्या कथा सांगून आम्ही रात्री

मुक्कामाला तामसा येथे श्री बंडेवार यांच्या घरी गेलो. दुसऱ्या दिवशी श्री रविसेठ बंडेवार यांचे घरी हवन, भजन, प्रवचन पार पडले. नंतर विद्यासागर मुलींचे हायस्कूल येथे दुपारी ३ ते ४ भजन व हैद्राबाद मुक्ती संग्रामावर व्याख्यान दिले. यास प्रतिसाद उत्तम होता. पुढील दिवशी श्री बंडेवार यांचे मोठे बंधूकडे हवन केले. रात्री निवघा(बाजार) येथे मुक्कामाला श्री धोंडीराम आर्य (शिंदे) यांचेकडे निघालो. तेथे दि.२२ ते २४ ऑगस्ट दरम्यान आर्य समाजाच्या भव्य वास्तूत भजन, वेद प्रवचन पार पडले. येथील प्रवचनाचे विषय होते वेद, महर्षी दयानंद यांचे जीवन चरित्र व कार्य, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसन मुक्ती, गोमाता आर्यसमाजाचा प्रचार इत्यादी होते. येथील कार्यक्रमास ४०-५० स्त्री-पुरुष गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, व्यापारी, शेतकरी, युवक उपस्थित होते. शेवटच्या दिवशी भंडाऱ्याचा कार्यक्रम होता. येथे गंगाराम पाटील हायस्कूलमध्येही आमचा कार्यक्रम झाला.

निवघा (बाजार) या गावात गुरुकुलचे ५-६ स्नातक आहेत. श्री शामसुंदर कदम हे युवक आर्यसमाजाचे प्रधान आहेत. त्यांचे शिक्षण गुरुकुल येडशी जि.धाराशिव (उस्मानाबाद) येथे १२वी पर्यंत झाले आहे. ७५ वर्षे वयाचे कार्यक्षम मंत्री श्री धोंडीराम आर्य (शिंदे)यांचा तरुणांना लाजवेल असा उत्साह आहे. यांची २ मुले गुरुकुल होशंगाबाद चे सुयोग्य स्नातक व प्राध्यापक आहेत. मोठे चिरंजीव प्रा.डॉ.नरेंद्र यांच्या पत्नी सौ.मधुमती या आर्य समाजाचे प्रसिद्ध दिवंगत विद्वान श्रद्धेय आचार्य शिवमुनिजी(औराद) यांच्या कन्या आहेत. लहान मुलगा दीपक वडिलांसोबत राहून सॉ मीलच्या व्यवसायात मदत करतो. श्री धोंडीराम आर्य यांचे शिक्षण जास्त झाले नाही. लहान असतांना अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत दिवस काढले. परमेश्वराच्या कृपेने ते आर्य समाजाच्या संपर्कात आले व त्यांच्या जीवनाचे कल्याण झाले.

अशा प्रकारे आमचा वैदिक धर्म प्रचाराचा दौरा अतिशय उत्तमरितीने संपन्न झाला. जेथे जेथे आर्य समाज आहे, तेथे युवा वर्ग आकर्षित होत आहेत. प्रचार काळात ज्या आर्य सज्जन महानुभावांचा संपर्क आला व त्यांनी आमची पुरेपूर व्यवस्था केली. प्रेम व स्नेहाने आमच्याशी नाते जोडले. त्याबद्दल आम्ही त्यांचे मन:पुर्वक ऋणी आहोत.

- 'आर्यकुटी', कौठा परिसर,
लातूर रोड, नांदेड.
मो.८८८८३३११०४,८९९९६६०२०९

* * *

(शोकवार्ता)

कर्ममुनिजींना पुत्रशोक

परळी येथील आर्य समाजाचे कर्मचारी व वयोवृद्ध वानप्रस्थी श्री कर्ममुनिजी यांचे द्वितीय सुपुत्र श्री साहेब सोपानराव मस्के यांचे दि.९ सप्टेंबर रोजी रात्री अल्पशा आजाराने आकस्मिक निधन झाले. मृत्युसमयी ते ४५ वर्षे वयाचे होते. दुर्दैवाने मागील १५ दिवसांपूर्वीच त्यांच्या पत्नीचे विषमज्वराने अकाली निधन झाले होते. अशा एकामागून एक दुर्दैवी घटनांमुळे कर्ममुनिजी व मस्के कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या मागे दोन मुले व एक मुलगी, वडील, दोन भाऊ, बहिणी असा परिवार आहे.

स्व.श्री साहेब मस्के हे परळीच्या श्री सरस्वती विद्यालयात चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून कार्यरत होते. विद्यार्थी जीवनात व्यायाम व मल्लखांब खेळात अग्रभागी असलेल्या श्री मस्के यांना राष्ट्रपती पुरस्कार ही मिळाला होता. क्रीडाशिक्षक श्री सुभाष नानेकर व म.दयानंद व्यायामशाळेचे प्रमुख श्री देविदासराव कावरे यांच्या मार्गदर्शनामुळे आर्यवीर दलाच्या राष्ट्रीय शिबिरात सहभागी झाले होते.

प्रल्हादराव मानकोसकर यांचे निधन

निटूर (ता.निलंगा जि.लातूर) येथील आर्य समाजाचे प्रतिष्ठित कार्यकर्ते, निवृत्त शिक्षक व परिसरातील पहिले वृत्तपत्रविक्रेते श्री प्रल्हादराव त्र्यंबकराव मानकोसकर यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी दि.१८ ऑगस्ट रोजी दुपारी २.४५ वा. अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी सुमनबाई, ३ मुले सर्वश्री शिवकुमार, ओमप्रकाश, वामनराव, एक मुलगी आणि सुना व नातू-नाती असा परिवार आहे.

श्री मानकोसकर यांना ४० वर्षांपूर्वी आर्य समाजाचे सान्निध्य लाभले. तेंव्हापासून आजतागायत वाचन, सत्संग, सभा-संमेलनात सहभाग, कीर्तन-प्रवचन या माध्यमातून ते आर्यमय होत गेले. वैदिक विचारांवर त्यांची दृढ श्रद्धा होती. चर्चा व बैठकांतून सामान्य लोकांना आर्य समाजाचे सिद्धांत पटवून देण्याचा ते प्रयत्न करीत असत. तत्त्वनिष्ठ शिक्षक म्हणून त्यांनी विद्यार्थी घडविण्याचेही कार्य केले. निटूर परिसरात ग्रामीण वाचकांना

त्यांनी वृत्तपत्रे उपलब्ध करून दिली. ते पहिले वृत्तपत्रविक्रेते (एजन्सीज) व पत्रकार ही होते. गावातील ग्रामपंचायतीचे सदस्य म्हणून त्यांनी मोलाची भूमिका बजावली. सामान्यांना मोलाचा सल्ला देणारे एक प्रतिष्ठित नागरिक म्हणूनही त्यांची सर्वत्र ओळख होती. गेल्या ५-६ वर्षांपासून मधुमेहाच्या आजाराने त्यांना ग्रासले. अशातही त्यांनी स्वत:ला सावरले. मात्र अलीकडे महिन्यापासून त्यांना हिवताप चढला व पायालाही इजा झाली होती. शेवटी उपचारांती त्यांची प्राणज्योत मालवली.

त्यांच्या पार्थिवावर दुसऱ्या दिवशी पं.ज्ञानकुमार आर्य, सभेचे मंत्री राजेंद्र दिवे व इतरांच्या पौरोहित्याखाली वैदिक पद्धतीने अंत्यसंस्कार पार पाडले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

वरील दोन्ही दिवंगत आत्म्यांना महाराष्ट्र सभा व आर्य समाजातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली..! शोकाकुल कुटुंबियांच्या दु:खात आर्यजन सहभागी आहेत...

महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभा - निवेदन

१) सभेतर्फे नुकत्याच संपन्न झालेल्या श्रावणी वेदप्रचारासंदर्भात आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या सूचना सभेला कळवाव्यात.

२) येत्या नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात विद्यार्थ्यांसाठी आयोजित वक्तृत्त्व स्पर्धांसाठी सर्व आर्य समाजांनी विद्यार्थी पाठवावेत.

३) डिसेंबर २०१९ मध्ये शाळा-महाविद्यालयांसाठी आयोजित 'वैदिक व्याख्यानमाला' अभियानास सर्वांनी सहकार्य करावे.

४) आगामी विधानसभा निवडणूकीत आर्य कार्यकर्त्यांनी आपल्या परिसरातील राजकीय पक्षाचा विचार न करता निर्व्यसनी, सदाचारी, राष्ट्रभक्त, भ्रष्टाचार विरहित अशा स्वच्छ प्रतिमा असलेल्या उमेदवारासच निवडून द्यावे.

- वैदिक गर्जना सूचना -

वैदिक मानवतेचे तत्त्वज्ञान व विचार आणि आर्य समाजाचे विविध कार्यक्रम जाणून घेण्याकरिता सूज्ञ वाचकांनी रू.१००० सभेकडे पाठवून 'वैदिक गर्जना' या मासिकाचे आजीवन सदस्य व्हावे. तसेच ज्या ग्राहकांना हे मासिक मिळत नसेल त्यांनी सभाव्यवस्थापक श्री रंगनाथ तिवार(मो.९४२३४७२७९२) यांचेशी संपर्क करावा.

एस.बी.आय.परळी खाते क्र.11154152843 IFSC Code-SBIN0003406

।। कृण्वन्तो विश्वमार्यम् ।।

श्रेष्ठ मानव बनों ! वेदों की ओर लौटो !



वेद प्रतिपादित मानवीय
जीवन मूल्यों को
जन-जन तक पहुँचाने हेतु
ार्यतत्पर सशक्त एवं समर्थ प्रान्तीय आर्य संगठन

महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा

(पंजीयन-एच. 333/र.नं.६/टी.इ. (७)१६७/१०४९,
स्थापना ५ मार्च १९७७)

मानव कल्याणकारी उपक्रम

- ‘वैदिक गर्जना’ मासिक मुखपत्र
- आर्य समाज दिनदर्शिका
- पू. हरिश्चन्द्र गुरूजी गौरव-‘मानवता संस्कार एवं आर्यवीरदल शिविर’
- आर्य कन्या वैदिक संस्कार शिविर
- पातञ्जल ध्यानयोग शिविर
- प्रान्तीय आर्य वीर दल प्रशिक्षण शिविर
- पुरोहित प्रशिक्षण शिविर
- मानव जीवनकल्याण वेद प्रचार (श्रावणी) उपाकर्म अभियान
- स्व. विठ्ठलराव बिराजदार स्मृति विद्यालयीन राज्य. वक्तृत्व स्पर्धा
- सौ. तारादेवी जयनारायणजी मुंदडा विद्यालयीन राज्य.निबंध स्पर्धा
- सौ. कलावतीबाई व श्री मन्मथअप्पा चिल्ले (आनन्दमुनि) महाविद्यालयीन राज्य. वक्तृत्व स्पर्धा
- विद्यार्थी सहायता योजना
- सौ.डॉ. विमलादेवी व श्री डॉ.सु.ब.काले (ब्रह्ममुनि) महाविद्यालयीन राज्य. निबन्ध स्पर्धा
- स्व.पं. रामस्वरूप लोखण्डे स्मृति संस्कृत राज्य प्रतियोगिताएं
- मानवजीवन निर्माण अभियान - विद्यालय व महाविद्यालयों के लिए (वैदिक व्याख्यानमाला)
- शान्तिदेवी मायर स्मृति मानवनिर्माण एवं सेवा योजना
- स्व. भसीन स्मृति एवं मायर गौरव स्वास्थ्य रक्षा एवं चिकित्सा शिविर
- शान्तिदेवी मायर विधवा सहायता योजना
- वैदिक साहित्य भेट योजना
- पंथ-जातिप्रथा निर्मूलन अभियान
- वैदिक साहित्य प्रकाशन योजना
- आपत्कालीन सहायता योजना
- पर्जन्यवृष्टि यज्ञ अभियान
- गौ-कृषि सेवा योजना
- स्वा.सै.श्री गुलाबचंदजी लदनिया गौरव राज्य योगासन प्रतियोगिता
- सौ.धापादेवी गु. लदनिया गौरव राज्य प्राणायाम प्रतियोगिता

धर्माबाद में भजन प्रस्तुत करते हुए पं.प्रदीपजी आर्य। साथ में हैं वैदिक विद्वान पं.शिवकुमारजी शास्त्री।

लातूर में आर्यों को सम्बोधित करते हुए स्वामी अखिलानन्दजी सरस्वती।

वारजे–पुणे में व्याख्यान देते हुए वैदिक विद्वान पं.ब्रिजेशजी शास्त्री। साथ में हैं भजनोपदेशक पं.ऋषिपालजी पथिक।

Reg.No.MAHBIL/2007/7493*Postal No.L/Beed/24/2018-2020

सेवा में,
श्री. ____________________

____

____

____

प्रेषक -
मन्त्री, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा,
आर्य समाज, परली-वैजनाथ.
पिन ४३१ ५१५ जि.बीड (महाराष्ट्र)

यह मासिक पत्र सम्पादक व प्रकाशक श्री मन्त्री, महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा द्वारा वैदिक प्रिंटर्स, परली वैजनाथ इस स्थलपर मुद्रित कर महाराष्ट्र आर्य प्रतिनिधि सभा के संपर्क कार्यालय आर्य समाज, परली वैजनाथ ४३१५१५ (महाराष्ट्र) इस स्थान से प्रकाशित किया।

भावपूर्ण श्रद्धाञ्जलि !





हैदराबाद स्वतन्त्रता संग्राम के स्वाधीनता सैनिक,
हिन्दी रक्षा आन्दोलन के सत्याग्रही,
लोकमान्य शिक्षण संस्था, पानचिंचोली (जि.लातूर)
के संस्थापक, समाजसेवी व्यक्तित्व
पिताजी स्व.श्री.वासुदेवराव हनुमंतराव होलीकर एवं
माताजी स्व.श्रीमती रुक्मिणीदेवी वासुदेवराव होलीकर
की पावन स्मृति में उनके सुपुत्र प्रो.ओमप्रकाशजी होलीकर एवं परिवार
की ओर से वैदिक गर्जना मासिक का रंगीन मलपृष्ठ भेंट